जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 NOV 2017
Times of India

# University to celebrate foundation day tomorrow

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) will celebrate its 55th foundation day on Saturday, November 18 at its campus, university officials said.



The event will see felicitation of the ideal teachers from the department as well as the affiliated colleges. The administrative officers excelling in their duties and the wards of the teaching and non-teaching staff of the university, who have excelled in their academics will also be facilitated, reads an official circular.

S P Kane, vice-chancellor of the Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University (RTMNU), will be preside over the function.

SUK was established in 1962 in Kolhapur city. Presently, the university has more than 4 lakh students enrolled in different courses at the university. The university has 283 affiliated colleges from across Sangli, Satara and Kolhapur districts.

17 NOV 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इंद्रधनुष्य युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाला उपविजेतेपद

प्रतिनिधी
कोल्हापूर

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथे नुकत्याच पार पडलेल्या १५ व्या राज्य आंतरविद्यापीठ 'इंद्रधनुष्य" युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाच्या संघाने पंधरा वर्षात प्रथमच दुसऱ्या क्रमांकाचे सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले. या युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठातील ऋषिकेश देशमाने या विद्यार्थ्यास गोल्डन बॉय" म्हणून गौरविण्यात आले.

इंद्रधनुष्य युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठ संघाने कातरकाम प्रथम क्रमांक, मातीकाम द्वितीय क्रमांक, भित्तीचित्र प्रथम क्रमांक, लघुनाटिका प्रथम क्रमांक, वाद्यवृंद प्रथम क्रमांक, वेस्टर्न ऑर्केस्ट्रा तृतीय क्रमांक, समुहगीत तृतीय क्रमांक, सूरवाद्य प्रथम क्रमांक, तालवाद्य प्रथम क्रमांक, शास्त्रीय गायन तृतीय क्रमांक, लोकनृत्य द्वितीय क्रमांक, मूकनाटय द्वितीय क्रमांक, फाईन आर्टसमध्ये विजेतेपद तर एकूण स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे सर्वसाधारण विजेतेपदाचा मान पटकाविला.



**कोल्हापूर : वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील १५ व्या राज्य आंतरविद्यापीठ इंद्रधनुष्य" युवा महोत्सवात दुसऱ्या क्रमांकाचे सर्वसाधारण विजेतेपद स्वीकारताना शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी संघ.**

या संघास कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्र–कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, डॉ. आर. व्ही. गुरव, प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील, डॉ. टी. पी. शिंदे, प्रा. एल. सी. वेळेकर, प्रा. शुभांगी कांबळे आदींचे मार्गदर्शन लाभले.

17 NOV 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाची आज निवडणूक



## अधिकार मंडळांसाठी तीन जिल्ह्यात होणार मतदान : १५६ उमेदवारांचे भवितव्य २२ हजार मतदारांच्या हाती

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोल्हापूरसह सांगली, सातारा या जिल्ह्यातील शैक्षणिक आणि राजकीय वर्तुळाचे लक्ष लागून राहिलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी शुक्रवार १७ रोजी मतदान होत आहे. ३३ केंद्रांवर ३८ बुथवर सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी ७२ जागांसाठी १५६ उमेदवार रिंगणात असून २२ हजार मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

दरम्यान, शिवाजी विद्यापीठाच्या प्रशासनाने या निवडणुकीची तयारी पूर्ण केली असून संपूर्ण यंत्रणा सज्ज ठेवली आहे. तिन्ही जिल्ह्यातील केंद्रांवर मतदानासंदर्भातील सर्व साहित्य पोहचविण्यात आले असून गुरुवारी केंद्र प्रमुखांसह इतर अधिकार आणि कर्मचारी तयारीत मग्न होते. मतदान केंद्रांवर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. गुरूवारी निवडणूक निर्णय अधिकारी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी मतदान केंद्रांना भेटी देऊन पाहणी केली. कोल्हापूरसह सांगली आणि सातारा जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ विविध अधिकार मंडळाच्या शुक्रवारी होणाऱ्या निवडणुकीच्या पूर्वसंध्येला मतदान केंद्रावर तयारी करण्यात आली आहे.**

### मतदानाच्या पूर्व संध्येला राजकीय घडामोडी

शुक्रवारी होणाऱ्या मतदानापूर्वी गुरुवारी विद्यापीठ विकास आघाडी, सुटा, आजी माजी विद्यार्थी संघटना, विद्यापीठ विकास मंच यांच्यासह इतर आघाड्यावर व अपक्ष उमेदवारांनी शेवटच्या दिवशी मतदारांशी संवाद साधला.काही ठिकाणी अर्थपूर्ण घडामोडी घडल्याचीही चर्चा रंगली होती.

### ७२ जागा, १५६ उमेदवार, २२ हजार मतदार

या निवडणुकीत विविध अभ्यास मंडळांवर ७२ जागांसाठी १५६ उमेदवार आपले नशिब आजमावित आहेत. २२ हजार मतदारांचे या उमेदवारांचे भवितव्य ठरविणार आहेत. दरम्यान, शुक्रवारी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदान झाल्यानंतर सोमवारी मतमोजणी होणार असून त्याच दिवशी निकाल जाहीर केला जाणार आहे.

### अशी आहे मतदान प्रक्रिया

मतपत्रिकेवर मराठी किंवा इंग्रजीमध्ये उमेदवाराचा पसंती क्रमांक अंकामध्ये निळ्या शाईच्या पेनने लिहून मतपेटीत टाकावयाचा आहे. मतदानाला येताना मतदारांनी १७ ओळखपत्रांपैकी एक ओळखपत्र आणणे आवश्यक आहे. या ओळखपत्रांची यादी शिवाजी विद्यापीठाने आपल्या संकेतस्थळावर टाकली आहे. त्याचबरोबर उमेदवारांच्या पोलिंग एंजटनेही मतदान केंद्रावर येताना संबंधित उमेदवाराचे अधिंकृत मान्यता पत्र (ॲथॉरिटी लेटर) घेऊन यावे, असे आवाहन निवडणूक कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी केले.

### जिल्ह्यात सात ठिकाणी मतदान केंद्रे

कोल्हापूर जिल्ह्यात कोल्हापूर शहरातील शहाजी कॉलेज, कॉमर्स कॉलेज आणि साबयर कॉलेज या तीन कॉलेजमध्ये मतदान केंद्रे आहेत. त्याच बरोबर गडहिंग्लज, जयसिंगपूर, पेठवडगाव, वारणानगर या ठिकाणी असलेल्या कॉलेजमध्ये मतदान केंद्रे उभारली आहेत.

### विद्यापीठ विकास आघाडीसह विकास मंचला सहा उमेदवारांचा पाठिंबा

पदवीधर व शिक्षक मतदार संघातून सहा उमेदवारांनी माघार घेत सोशल मीडियाच्या माध्यमातून माघारीची घोषणा केली आहे. यामध्ये पदवीधरमधून नितीन पाटील, अमित जाधव तर शिक्षक मतदार संघातून डॉ. गिरीश नाईक, डॉ. भरत पाटील, डॉ. किशोर जाधव, महिला प्रवर्गातून डॉ. विद्या पाटील यांचा समावेश आहे, अशी माहिती पत्रकाव्दारे विद्यापीठ विकास मंचने प्रसिध्द केली आहे.

### राज्यशास्त्र अभ्यासमंडळ बिनविरोध

राज्यशास्त्र अधिकार मंडळासाठी अनेक उमेदवार इच्छुक होते. मात्र विद्यापीठ विकास आघाडीच्या डॉ. वासंती रासम यांनी सर्वांना एकत्र करून चर्चा केली. या चर्चेतून सामोपचाराची भूमिका घेत प्राचार्य डॉ. एस. डी. पवार, डॉ. शिवाजी पाटील, डॉ. अमिता कणेगावकर या उमेदवारांची राज्यशास्त्र अभ्यास मंडळावर बिनविरोध निवड करण्यात आली. त्यामुळे राज्यशास्त्र अधिकार मंडळाची निवडणूक बिनविरोध झाली आहे; असे परिपत्रक विद्यापीठ प्रशासनाने संकेतस्थळावर जाहीर केले आहे.

### राज्यपाल व कुलगुरू नियुक्त उमेदवारांची यादी निकालानंतर

राज्यपाल व कुलगुरू नियुक्त उमेदवारीसाठी सर्वच संघटनांनी नावे पाठवली आहेत. यामंध्ये काही बड्या लोकांच्या नावाचीही चर्चा आहे. या उमेदवारांची यादी निवडणुकीपुर्वी जाहीर करणे अपेक्षित होते. मात्र ही नावे मतमोजणीनंतरच जाहीर होणार असल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली. असे असले तरी या यादीकडे विद्यापीठ परीक्षेत्राचे लक्ष लागले आहे.

17 NOV 2017.

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**मतमोजणी सोमवारी :** ७२ जागांसाठी १५६ उमेदवार रिंगणात; ११ अभ्यास मंडळे, चार गटांतील १६ जागा बिनविरोध

# विद्यापीठ अधिसभेसाठी आज मतदान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाची अधिसभा आणि अन्य अधिकार मंडळांसाठी आज, शुक्रवारी सकाळी नऊ ते सायंकाळी पाच या वेळेत विद्यापीठ कार्यक्षेत्रातील ३३ केंद्रांवर मतदान होणार आहे. विविध अधिकार मंडळांच्या ७२ जागांसाठी १५६ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. ११ अभ्यास मंडळांसह इतर चार गटांतील १६ जागा बिनविरोध झाल्या आहेत. उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांचा प्रत्यक्ष गाठीभेटी, मोबाईल आणि सोशल मीडियावर गुरुवारी प्रचार रंगला.

नव्या विद्यापीठ कायद्यानुसार अधिसभा, अभ्यास मंडळे, प्राचार्य, संस्थाचालक, नोंदणीकृत पदवीधर, महाविद्यालय शिक्षक, विद्यापीठ शिक्षक आणि विद्या परिषद (शिक्षक) गटनिहाय निवडणूक होत आहे. यासाठी एकूण १८८ जागा आहेत. त्यांपैकी ११ अभ्यास मंडळे (विभागप्रमुख) आणि संस्था प्रतिनिधी सहा, नोंदणीकृत पदवीधर एक, शिक्षक (अधिसभा) एक आणि प्राचार्य गटातील आठ जागा बिनविरोध झाल्या आहेत. या सर्व गटांतील उर्वरित एकूण ७२ जागांसाठी १५६ उमेदवारांमध्ये लढत रंगली आहे. शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी, विद्यापीठ विकास मंच, विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा), विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समितीसह काही अपक्ष उमेदवार या निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. त्यांनी नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून विद्यापीठ आणि कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील महाविद्यालयांमध्ये प्रचार केला आहे. या उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांकडून गुरुवारी रात्री उशिरापर्यंत प्रचार सुरु होता. दरम्यान, या निवडणुकीसाठी विद्यापीठ प्रशासनाकडून कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील मतदान केंद्रांवर मतपत्रिका आणि मतपेट्या गुरुवारी पाठविल्या आहेत. मतदानाची सर्व तयारी पूर्ण झाल्याचे कुलसचिव व निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. विलास नांदवडेकर यांनी सांगितले. ते म्हणाले, विद्यापीठातील परीक्षा भवनमध्ये सोमवारी (दि. २०) सकाळी आठ वाजता मतमोजणी सुरु होईल. यासाठी २० टेबल असणार आहेत. मतदान आणि मतमोजणीची प्रक्रिया या निवडणुकीतील सर्व घटकांनी शांततेत पार पाडावी.




नसीर अत्तार

शिवाजी विद्यापीठाची अधिसभा, अन्य अधिकार मंडळांसाठी आज, शुक्रवारी मतदान होणार आहे. यासाठी कोल्हापुरात गुरुवारी कॉमर्स कॉलेजमध्ये मतदानाचे बूथ लावण्याचे काम सुरू होते.

## मतदारांनी हे लक्षात ठेवावे

- पसंती क्रमांकानुसार मतदान करावयाचे आहे.
- पसंती क्रमांक हा इंग्रजी अथवा मराठी यांपैकी एकाच पद्धतीने लिहावा. हा क्रमांक अक्षरी अथवा रोमन अंकात नमूद करता येणार नाही.
- मतदानासाठी येताना ओळखपत्र बंधनकारक.
- मतपत्रिकेवर पसंतीदर्शक अंकामध्ये कोणतीही खाडाखोड करु नये.

## गटनिहाय जागा

- अभ्यास मंडळे : १४१
- प्राचार्य (अधिसभा) : १०
- संस्थाचालक : ६
- नोंदणीकृत पदवीधर : १०
- शिक्षक : १०
- विद्यापीठ शिक्षक : ३
- विद्या परिषद (शिक्षक) : ८

## राज्यशास्त्राचे अभ्यास मंडळ बिनविरोध

विद्यापीठातील ४७ अभ्यास मंडळांसाठी यावेळी निवडणूक होणार आहे. यातील राज्यशास्त्र विषयाच्या अभ्यास मंडळाची निवडणूक बिनविरोध झाली आहे. विद्यार्थ्यांना राज्यशास्त्राचे धडे देणाऱ्या या अभ्यासक्रमाची निवडणूक बिनविरोध झाल्याची चर्चा विनोदी पद्धतीने विद्यापीठात रंगली आहे.

## जिल्हा मतदान केंद्रे

१ **कोल्हापूर :** सायबर, शहाजी कॉलेज, कॉमर्स कॉलेज (कोल्हापूर), दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज (इचलकरंजी), आचार्य जावडेकर अध्यापक महाविद्यालय (गारगोटी), देवचंद कॉलेज (अर्जुननगर), शिवराज महाविद्यालय (गडहिंग्लज), जयसिंगपूर कॉलेज, यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, श्री शिव-शाहू महाविद्यालय (सरुड), पेठवडगाव.

२ **सांगली :** विलिंग्डन कॉलेज, कस्तुरबाई वालचंद कॉलेज, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज (मिरज), केबीपी कॉलेज, केआरपी कॉलेज इस्लामपूर, डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय (तासगाव), बळवंत कॉलेज (विटा), आर्टस, सायन्स, अँड कॉमर्स कॉलेज (रामानंदनगर), राजे रामराव महाविद्यालय (जत), श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय (आटपाडी), डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय (कवठेमहांकाळ).

३ **सातारा :** छत्रपती शिवाजी कॉलेज, लाल बहादूर शास्त्री कॉलेज (सातारा), सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, महिला महाविद्यालय (कऱ्हाड), मुधोजी कॉलेज (फलटण), किसन वीर कॉलेज (वाई), दहीवडी कॉलेज, डी. पी. भोसले कॉलेज (कोरेगाव), बाळासाहेब देसाई कॉलेज (पाटण), शरदचंद्र पवार महाविद्यालय (लोणंद), श्री शहाजीराजे महाविद्यालय (खटाव).

17 NOV 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ निवडणुकीसाठी आज मतदान

## ७२ जागांसाठी १५६ उमेदवारांच्यात लढत

- पदवीधर, शिक्षक मतदारसंघासाठी जोरदार चुरस
- मतदान केंद्रावर सीसीटीव्हीची नजर
- पसंती क्रमांक पद्धतीने मतदान; सोमवारी मतमोजणी
- आघाडी आणि सुटा यांच्यात थेट सामना

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ अधिसभा आणि विविध अधिकार मंडळासाठी शुक्रवारी (दि. १७) मतदान होत आहे. ७२ जागांसाठी १५६ उमेदवार रिंगणात आहेत. पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघात मतदारांची आणि उमेदवारांची संख्या जास्त असल्याने जोरदार चुरस होणार आहे. कोल्हापूर, सांगली व सातारा येथील एकूण ३३ केंद्रावर ३८ बुथद्वारे मतदान होणार आहे. यासाठी एकूण २२ हजारांहून अधिक मतदार आहेत. शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी आणि शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) यांच्यात थेट सामना रंगणार आहे.

शिवाजी विद्यापीठ निवडणुकीसाठी शुक्रवारी सकाळ नऊ ते पाच या वेळेत मतदान होणार आहे. कोल्हापूर शहरातील सायबर इन्स्टिट्यूट, शहाजी महाविद्यालय, डीआरके कॉमर्स कॉलेज आदी केंद्रांवर मतदान होणार आहे. जिल्ह्यांत गडहिंग्लज येथील शिवराज कॉलेज, जयसिंगपूर कॉलेज, पेठ वडगाव, वारणानगर येथील केंद्रावर मतदान होईल. सांगली व सातारा येथील केंद्रावरही मतदान होईल. मतदान केंद्रावर सीसीटीव्ही असणार आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आज मतदान केंद्रांना भेटी देऊन पाहणी केली.

शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी व शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ यासह पदवीधर गटांतील चार जागेवर विद्यापीठ कृती समिती यांच्यात जोरदार लढत होत असल्याने शिक्षण क्षेत्राच्या या निवडणुकीकडे नजरा लागून राहिल्या आहेत.

सर्व नोंदणीकृत मतदारांनी मतदानात सहभागी व्हावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी केले आहे.

### वर्चस्व कुणाचे?

*नव्या कायद्यानुसार ही निवडणूक होत आहे. या निवडणुकीत ४७ पैकी फक्त १५ अभ्यास मंडळांचीच निवडणूक होत आहे. बहुतांश अभ्यासमंडळे बिनविरोध झाली आहेत. संस्था गटातील सहाही जागा बिनविरोध झाल्या आहेत. प्राचार्य गटातील आठ जागा बिनविरोध झाल्या असून, एका जागेसाठी निवडणूक होत आहे. तर शिक्षक आणि पदवीधर या गटांतील प्रत्येकी एक जागा बिनविरोध झाली असून दोन्ही गटांत नऊ जागांसाठी निवडणूक होत आहे. विद्या परिषदेच्या चार जागांसाठी तर विद्यापीठ शिक्षकांच्या तीन जागांसाठी निवडणूक होत आहे. सिनेट आणि अॅकॅडेमिक कौन्सिलवर वर्चस्व कुणाचे असणार हे मतदानानंतर स्पष्ट होईल.*

### पॉलिटीक्समध्ये नो पॉलिटीक्स!

पॉलिटीक्स अभ्यासमंडळांची निवडणुक बिनविरोध झाली आहे. राज्यशास्त्र विभागातील निवडणुक बिनविरोध झाल्याने पॉलिटीक्समध्ये नो पॉलिटीक्स अशी चर्चा आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 NOV 2017
पुण्यनगरी

# विद्यापीठ अधिकार मंडळासाठी आज मतदान

## १४६ जागांसाठी २५८ उमेदवार रिंगणात

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठ अधिसभा आणि विविध अधिकार मंडळासाठी शुक्रवार, दि. १७ रोजी मतदान होणार आहे. १४६ जागांसाठी २५८ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत; तर कोल्हापूर, सांगली, सातारा या ठिकाणच्या ३३ केंद्रावरील ३८ बूथवार सकाळी ८ ते सायंकाळी ५ वा. या वेळेत मतदान होणार आहे.

विविध मंडळांच्या नियुक्तीसाठी घेण्यात येणाऱ्या निवडणुकीसाठी शेवटच्या मतदारापर्यंत पोहोचण्यासाठी सोशल मीडियासह विविध माध्यमांचा वापर करण्यात आला, तर शेवटच्या दिवसापर्यंत उमेदवार माघारी सुरू होती. आघाडी व सुटा या दोन्ही गटाकडून जोरदार प्रचार करण्यात आला. पदवीधर गटाच्या ९ जागांसाठी १४ हजार मतदार मतदान करणार आहेत. त्यामुळे या गटाच्या मतदानाकडे साऱ्यांचेच लक्ष लागले आहे. अधिसभा व विविध मंडळांसाठी एकूण २२ हजार मतदार मतदान करणार आहेत.



### निवडणुकीची जय्यत तयारी

मतमोजणीसाठी ११५ कर्मचारी स्वतंत्रपणे तयार असून मतपत्रिका वाटप, मतपेट्या या सर्व मतदान यंत्रणाची जोडणी गुरुवारपर्यंत पूर्ण करण्यात आली आहे. शुक्रवारी सकाळपासून विविध ठिकाणच्या मतदान केंद्रावर मतदान होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 NOV 2017
महाराष्ट्र टाईम्स

# सिनेट निवडणुकीसाठी आज मतदान

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळासाठी (सिनेट) शुक्रवारी (ता.१७) होत असलेल्या निवडणुकीच्या तयारीसाठी विद्यापीठ प्रशासन यंत्रणा सज्ज झाली. निवडणुकीची मतदान प्रक्रिया राबविण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने ११५ कर्मचाऱ्यांची नेमणूक केली आहे. गुरुवारी (ता. १६) रात्रीच कोल्हापूर जिल्ह्यासह सांगली व सातारा जिल्ह्यातील मतदान केंद्रावर पोहोचून कर्मचाऱ्यांनी मतदानप्रक्रियेची सूत्रे घेतली.

अधिसभा आणि विविध अधिकार मंडळांच्या १४६ जागांसाठी आज शुक्रवारी सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत मतदान होणार आहे. २० नोव्हेंबरला निकाल जाहीर होणार आहे. नवीन विद्यापीठ कायद्यानुसार प्रथमच ही निवडणूक होत असून, विधानसभा निवडणूक धर्तीवर रचना करण्यात आली आहे. मतदान प्रक्रियेवर सीसीटीव्ही कॅमेऱ्याची नजर राहणार आहे. निवडणुकीच्या मतदानासाठी कोल्हापूर सांगली व सातारा या जिल्ह्यातील ३३ केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. या केंद्रांवर ३८ बूथ असून, २२ हजारांहून अधिक मतदार मतदान करणार आहेत.

**मतदान - शुक्रवार १७ नोव्हेंबर २०१७**

| | |
|---|---|
| एकूण जागा | १४६ |
| मतदान केंद्रे | ३३ |
| मतदार | २२००० |
| नियुक्त कर्मचारी | ११५ |
| निकाल | २० नोव्हेंबर |



**आज सुट्टी**

सिनेट निवडणुकीच्या मतदानादिवशी शिवाजी विद्यापीठाच्या अखत्यारितील कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील महाविद्यालये तसेच विद्यापीठाला सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. शिपाईपासून प्राचार्यांपर्यंत सर्वांना सुट्टी लागू असेल, असे विद्यापीठ प्रशासनाने पत्रकाद्वारे जाहीर केले आहे

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 NOV 2017
सकाळ

# सिनेटसाठी आज मतदान

कोल्हापूर, ता. १६ : शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांसाठी (सिनेट) उद्या (ता. १७) मतदान होत आहे. त्यासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली असून, शिवाजी विद्यापीठ विकास मंच व शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी यांच्यातील मैत्रीपूर्ण आघाडी, शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघातील (सुटा) बंडाळी व आजी-माजी विद्यार्थी कृती समितीने विद्यार्थ्यांसाठी पुकारलेला लढा या पार्श्वभूमीवर कोणाच्या पारड्यात किती मते पडणार, याची उत्सुकता आहे.



सोमवारी (ता. २०) सकाळी नऊ ते सायंकाळी पाच या वेळेत कोल्हापूर, सांगली व सातारा

पान ९ वर »

# सिनेटसाठी आज मतदान

» पान १ वरून

जिल्ह्यातील मतदान केंद्रांवर मतदान होत आहे. शहरात सायबर, कॉमर्स व शहाजी छत्रपती महाविद्यालयात मतदान होईल. पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी विकास मंच व विकास आघाडीची गट्टी होण्यापासून घातलेले बारकाईने लक्ष पाहता निवडणुकीत किती रंग भरणार, याचे चित्र स्पष्ट झाले होते. दिवसागणिक घडणाऱ्या घडामोडींची माहिती त्यांच्यापर्यंत पोचवण्यास यंत्रणाही तत्पर होती. विजय मिळवण्यासाठी विकास आघाडी व विकास मंचने कंबर कसलेली आहे. दुसरीकडे सुटाची विस्कटलेली घडी आणि डॉ. आर. डी. ढमकले यांनी केलेली बंडाळी यांतूनही जणू काहीच घडले नाही, अशा वातावरणात 'सुटा'ने प्रचारावर दिलेला जोर महत्त्वपूर्ण राहिला. आजी-माजी विद्यार्थी कृती समितीनेसुद्धा आपले अस्तित्व सिद्ध करण्यासाठी खटाटोप केला. या परिस्थितीत उद्या (ता. १७) मतदान होत असून, आज सायंकाळपर्यंत वैयक्तिक गाठीभेटी व मोबाईलवरून संपर्क सुरू होता. आपापल्या उमेदवारांना निवडणुकीत विजयी करा, असे मतदारांना सांगितले जात होते.

निवडणुकीसाठी जिल्ह्यात एकूण ३३ मतदान केंद्रे असून, १४६ जागांसाठी निवडणूक होत आहे. निवडणूक ओळखपत्र, पासपोर्ट, वाहनचालक परवाना, पॅनकार्ड, राष्ट्रीयीकृत बँकेचे पासबुक, स्वातंत्र्यसैनिक ओळखपत्र, जातप्रमाणपत्र, आधारकार्ड मतदारांकडे आवश्यक आहे. निवडणुकीच्या निमित्ताने विद्यापीठाच्या कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांना व विद्यापीठाला उद्या (ता. १७) सुटी जाहीर केली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 NOV 2017
सकाळ

# 'सुटा'चे प्रा. कुंभार अधिसभेवर बिनविरोध

कोल्हापूर, ता. १६ : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेच्या शिक्षक गटातून ओबीसी संवर्गातील 'सुटा' पुरस्कृत उमेदवार प्रा. प्रकाश कुंभार यांची बिनविरोध निवड झाली. असे पत्रक 'सुटा'चे सहकार्यवाहक प्रा. डॉ. आर. जी. कोरबू यांनी दिले.

तळसंदे येथील डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालाचे प्राचार्य डॉ. एस. आर. पावसकर यांनी प्राचार्य असूनही अधिसभेसाठी शिक्षक गटातून उमेदवारी अर्ज दाखल केला होता. वस्तुतः प्राचार्यांना शिक्षक गटातून उमेदवारी अर्ज दाखल करता येत नाही. यासंदर्भात सुटाने तक्रार केली होती. तक्रारीच्या पडताळणीनंतर प्राचार्य वापसकर हे शिक्षक गटातील उमेदवारांसाठी अपात्र असल्याची अधिसूचना जारी करण्यात आली. त्यामुळे शिक्षक गटातील ओबीसी संवर्गातील प्रा. कुंभार यांचा एकच उमेदवारी अर्ज राहील्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे पत्रकात म्हटले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 NOV 2017
महाराष्ट्र टाईम्स

# डॉ. पावसकर अपात्र; प्रा. कुंभार बिनविरोध

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीत शिक्षक गटातून ओबीसी वर्गातील सुटा पुरस्कृत प्रा. प्रकाश कुंभार यांची बिनविरोध निवड झाल्याची माहिती सुटाचे सहकार्यवाह डॉ. आर. जी. कोरबू यांनी पत्रकाद्वारे दिली आहे. डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. एस. आर. पावसकर यांनी शिक्षक गटातून अर्ज भरला होता. ही उमेदवारी नियमबाह्य असल्याचा आक्षेप सुटातर्फे घेण्यात आला. तक्रारीच्या पडताळणीनंतर पावसकर हे शिक्षक गटातील उमेदवारीसाठी अपात्र असल्याची अधिसूचना विद्यापीठ प्रशासनाने जाहीर केली.

दरम्यान, या गटात आता डॉ. कुंभार यांचा एकमेव अर्ज असल्याने त्यांचा बिनविरोधचा मार्ग मोकळा झाला आहे. शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीच्या सातारा येथील एका उमेदवारांनेही निकष डावलून अर्ज दाखल केला असल्याची तक्रार सुटाने केली आहे. या तक्रारींची चौकशी सुरू असून अद्याप विद्यापीठ प्रशासनाने यावर निर्णय घेतलेला नाही. अर्ज दाखल केल्यानंतर त्याची योग्य छाननी न करण्याचा बेजबाबदारपणा विद्यापीठ प्रशासन करत आहे असा आरोप सुटाने पत्रकात केला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 NOV 2011
पुण्यनगरी

# सुटाचे प्रकाश कुंभार अधिसभेवर बिनविरोध

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेवर शिक्षक गटातून ओबीसी संवर्गातील सुटा पुरस्कृत उमेदवार प्रा. प्रकाश कुंभार बिनविरोध निवडून आल्याचे पत्रक सुटाचे सहकार्यवाह प्रा. डॉ. आर. जी. कोरबू यांनी प्रसिद्धीस दिले आहे. या पत्रकात, अधिसभा निवडणुकीसाठी डी.. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, तळसंदे येथील प्राचार्य डॉ. एस. आर. पावसकर यांनी शिक्षक गटात उमेदवारी अर्ज दाखल केला होता. वस्तुतः प्राचार्यांना शिक्षक गटातून उमेदवारी दाखल करता येत नाही. त्यासंदर्भात सुटाने तक्रार केली होती. त्याच्या पडताळणीनंतर पावसकर यांची उमेदवारी अपात्र असल्याचे नोटिफिकेशन जारी करण्यात आले. त्यामुळे शिक्षक ओबीसी संवर्गातील कुंभार यांचा एकच अर्ज असल्याने त्यांची निवड बिनविरोध झाल्याचे म्हटले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 NOV 2017
पुढारी

■ विद्यापीठ निवडणूक

# 'सुटा'चे प्रा. कुंभार बिनविरोध

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठ महाविद्यालयीन शिक्षक गटातून ओबीसी प्रवर्गातून 'सुटा'चे प्रा. प्रकाश कुंभार हे बिनविरोध निवडून आले. या गटात त्यांचे प्रतिस्पर्धी असलेले डॉ. एस. आर. पावसकर यांचा अर्ज अपात्र ठरवण्यात आला आहे. पावसकर यांच्या विरोधात 'सुटा'ने तक्रार केली होती. विद्यापीठ प्रशासनाकडून भोंगळ कारभार सुरू असल्याचा आरोप या निमित्ताने 'सुटा'ने पत्रकातून केला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 NOV 2017
लोकमत

# 'सुटा'चे प्रकाश कुंभार अधिसभेवर बिनविरोध

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अधिसभेच्या शिक्षक गटातून ओबीसी संवर्गातील शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) पुरस्कृत उमेदवार प्रा. प्रकाश कुंभार हे बिनविरोध निवडून आले आहेत. विद्यापीठातर्फे गुरुवारी त्याची अधिसूचना जारी करण्यात आली, अशी माहिती 'सुटा'चे सहकार्यवाह प्रा. आर. जी. कोरबू यांनी गुरुवारी दिली.

तळसंदे येथील डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. पावसकर यांनी प्राचार्य असूनही अधिसभेसाठी शिक्षक गटातून उमेदवारी अर्ज दाखल केला होता. वस्तुतः प्राचार्यांना शिक्षक गटातून उमेदवारी दाखल करता येत नाही. याबाबत 'सुटा'ने विद्यापीठाकडे तक्रार केली होती. त्या तक्रारीच्या पडताळणीनंतर प्राचार्य पावसकर हे शिक्षक गटातील उमेदवारीसाठी अपात्र असल्याचे नोटिफिकेशन जारी करण्यात आले.

त्यामुळे शिक्षक गटातील ओबीसी संवर्गातील प्रा. कुंभार यांचा एकच उमेदवारी अर्ज असल्याने त्यांची निवड बिनविरोध झाली आहे, अशी माहिती प्रा. कोरबू यांनी पत्रकाद्वारे दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 NOV 2017
तरुण भारत

# महाविद्यालयीन प्रशासकीय सेवकांना उद्या सुट्टी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ विविध अधिकार मंडळासाठी उद्या शुक्रवार १७ रोजी मतदान होत आहे. तीन जिल्ह्यातील काही महाविद्यालयांवर ३३ मतदान केंद्र आहेत. त्यामुळे प्रशासकीय सेवकांना संबंधीत मतदान केंद्रावर मतदान करावे लागणार आहे. यासाठी महाविद्यालयातील प्रशासकीय सेवकांना शुक्रवारी मतदाना दिवशी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.